RNI No. MAHBIL /2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ५, अंक १२(३)] सोमवार, एप्रिल १, २०१३/चैत्र ११, शके १९३५ [पृष्ठे १६, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**नियोजन विभाग (रोहयो)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ एप्रिल २०१३

**अधिसूचना**

**महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७.**

क्रमांक बेभनि-२०१२/प्र.क्र.३०/रोहयो-१०.—महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७(१९७८ चा महा. २०) याच्या कलम ८ च्या पोट-कलम (८) आणि १७ च्या पोट-कलम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत समर्थन करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, तसेच त्यासंदर्भात करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करुन महाराष्ट्र शासन, उक्त अधिनियमाच्या कलम १७ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वप्रसिद्ध करण्यात आलेले पुढील नियम याद्वारे करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव** :—(१) या नियमांना महाराष्ट्र रोजगार हमी योजना-बेरोजगार भत्ता नियम,२०१३, असे म्हणावे,

(२) ते राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **व्याख्या** :—या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(क) " अधिनियम " याचा अर्थ महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७, असा आहे.

(ख) " दिवस " याचा अर्थ कामाचा दिवस, असा आहे.

(ग) " नमुना " याचा अर्थ या नियमांसोबत जोडलेला नमुना.

(घ) " बेरोजगार भत्ता " याचा अर्थ अधिनियमाच्या कलम ८ च्या पोट-कलम (४) अन्वये बेरोजगार व्यक्तीला द्यावयाचा असा आहे.

३. **बेरोजगार भत्ता मिळण्याचा हक्क** :—

या योजनेअंतर्गत ज्या व्यक्तीची नोंदणी करण्यात आली आहे आणि जिच्याकडे वैध जॉब कार्ड असेल आणि जिने अधिनियमांतर्गत रोजगार

मिळावा म्हणून ग्रामपंचायतीकडे किंवा कार्यक्रम अधिकारी किंवा सह कार्यक्रम अधिकारी यांच्याकडे अर्ज दिलेला असेल आणि असा रोजगार मिळावा म्हणून केलेला अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत जिला रोजगार देण्यात आला नसेल अशी व्यक्ती अधिनियमाच्या कलम ८ च्या पोट-कलम (४) अन्वये राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा दराने व अशा दिवसांकरिता दैनिक बेरोजगार भत्ता मिळण्यास पात्र असेल.

**४. बेरोजगार भत्ता, मंजुरी व अधिदान प्राधिकारी :-**

कार्यक्रम अधिकारी किंवा सह कार्यक्रम अधिकारी नियम ३ अन्वये देय बेरोजगार भत्ता मंजूर करील व संवितरित करील.

**५. बेरोजगार भत्ता प्रदान करण्याबाबतची कार्यपद्धती :-**

(क) बेरोजगार भत्त्याची मागणी करणारी व्यक्ती असा भत्ता मागण्यास ती ज्या दिवशी पात्र होईल त्या दिवसानंतर, बेरोजगार भत्त्याची मागणी केलेला या नियमांखालील नमुना क्रमांक १ मधील अर्ज ग्रामपंचायतीकडे करील.

(ख) अधिनियमाखालील नमुना ४ मधील, रोजगार मिळण्याची विनंती करणारा अर्ज देतेवेळी, मिळालेल्या अधिनियमाखालील नमुना क्रमांक ५ मधील पोचपावतीची प्रत उक्त अर्जासोबत जोडण्यात येईल.

(ग) उक्त अर्ज मिळाल्यावर ग्रामपंचायत, आवश्यक ती चौकशी करील आणि या योजनेअंतर्गत अर्जदाराची नोंदणी करण्यात आली आहे व त्याच्याकडे जॉब कार्ड आहे तसेच तो बेरोजगार भत्ता मिळण्यास हक्कदार आहे याबाबत तिची खात्री पटली असल्यास, ग्रामपंचायत अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून दोन दिवसांच्या आत कार्यक्रम अधिकारी /सह कार्यक्रम अधिकारी यांच्याकडे तिच्या अभिप्रायासह तो अर्ज पाठवील.

(घ) पोट-कलम ५ (ग) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे ग्रामपंचायतीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यक्रम अधिकारी किंवा सह कार्यक्रम अधिकारी आवश्यक ती चौकशी करील आणि जर अर्जदाराची योजनेअंतर्गत रोजगार मिळण्यासाठी नोंदणी झालेली आहे व तो बेरोजगार भत्ता मिळण्यास हक्कदार आहे अशी त्याची खात्री पटली तर, तो ज्या कालावधीकरिता बेरोजगार भत्ता देय असेल तो कालावधी दर्शविणारा नियमाखालील नमुना क्रमांक २ मधील तशा आशयाचा आदेश देईल आणि त्यांच्या आदेशानुसार पंधरा दिवसात बँक किंवा टपाल कार्यालय यामार्फत अर्जदाराच्या खात्यावर पैसे जमा करील.

(च) कार्यक्रम अधिकारी किंवा सह कार्यक्रम अधिकारी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना निधी असोसिएशन (महाराष्ट्र) सोसायटी यांच्या खात्यातील राज्य शासनाच्या हिश्श्यातून आवश्यक तो खर्च भागवील आणि एम. आय. एस. मध्ये नोंद करील. जर कार्यक्रम अधिकाऱ्याने अथवा सह कार्यक्रम अधिकाऱ्याने बेरोजगार भत्त्याची केलेली मागणी फेटाळली तर तो ती मागणी फेटाळण्यामागील कारणे नमूद करील आणि या नियमांखालील नमुना क्रमांक ३ मध्ये याबाबत अर्जदाराला कळवील. कार्यक्रम अधिकारी अथवा सह कार्यक्रम अधिकारी शक्य असेल तेथवर बेरोजगार भत्ता मिळण्यासाठीचा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत त्या अर्जावर निर्णय देईल.

**६. ग्रामपंचायतीची जबाबदारी :-**

(क) ग्रामपंचायत जर अर्जदाराचा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत अर्जदारास रोजगार देऊ शकत नसेल तर ती, ही बाब पुरेशी अगोदर सह कार्यक्रम अधिकाऱ्याच्या किंवा कार्यक्रम अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देईल, जेणेकरुन कार्यक्रम अधिकाऱ्याला किंवा सह कार्यक्रम अधिकाऱ्याला पर्यायी व्यवस्था करणे शक्य होईल.

(ख) बेरोजगार भत्ता मिळण्यासाठीचा अर्ज मिळाल्यानंतर ग्रामपंचायत, अर्जदाराच्या बेरोजगाराचा पुरावा म्हणून त्या प्रयोजनाकरिता ठेवलेल्या नोंदवहीमध्ये किंवा पटामध्ये अर्जदारास आपली दैनिक हजेरी लावण्याची अनुमती देईल.

(ग) ग्रामपंचायतीने या नियमाखालील नमुना क्र. ४ मध्ये बेरोजगार भत्त्याच्या वाटपाची नोंदवही ठेवावी. तसेच नमुना क्र.५ मध्ये बेरोजगार भत्त्याचे मासिक विवरणपत्र कार्यक्रम अधिकारी यांना सादर करावे.

**७. ग्रामपंचायतीने अर्ज स्वीकारणे, इत्यादींबाबत कसूर केल्यास त्याबरील कार्यपद्धती :-**

(क) अर्जदारास ग्रामपंचायतीने अधिनियमांतर्गत बेरोजगार भत्ता मिळण्यासाठीचा आपला अर्ज विचारार्थ स्वीकारण्यास नकार दिलेला आहे किंवा रोजगार मिळण्यासाठीच्या आपल्या मूळ अर्जास पोच दिलेली नाही याबद्दलचा पुरेसा पुरावा सोबत जोडून थेट कार्यक्रम अधिकाऱ्याकडे किंवा

सह कार्यक्रम अधिकाऱ्याकडे आपला अर्ज सादर करता येईल.

(ख) असा अर्ज मिळाल्यावर, कार्यक्रम अधिकारी किंवा सह कार्यक्रम अधिकारी, तो अर्ज ग्रामपंचायतीमार्फत पाठविण्यात आलेला नसला तरी यथायोग्य चौकशी करून व खात्री करून नियम ५ (घ) अनुसार तरतूद केल्याप्रमाणे योग्य ते आदेश देईल.

**८. बेरोजगार भत्ता देणे बंद करणे :-**

राज्य शासनाचे बेरोजगार भत्ता देण्याचे दायित्व संपुष्टात येईल. जर,—

(क) अर्जदारास ग्रामपंचायतीने किंवा कार्यक्रम अधिकारी किंवा सह कार्यक्रम अधिकारी याने कामावर उपस्थित राहण्याचे निर्देश दिल्यावर.

(ख) ज्या कालावधीकरिता रोजगाराची मागणी करण्यात आली असेल तो कालावधी समाप्त झाल्यावर.

**९. बेरोजगार भत्ता मागण्यास अपात्र ठरणे :–**

(क) पाऊस किंवा असामान्य नैसर्गिक आपत्तींसारख्या मानवी नियंत्रणापलीकडील परिस्थितीमुळे जर राज्य शासनास रोजगार पुरविणे शक्य नसेल (म्हणजेच कार्यक्रम अधिकारी किंवा सह कार्यक्रम अधिकारी यांस रोजगार मागणाऱ्या व्यक्तीला कामाचा आदेश असणारे पत्र देणे शक्य नसेल अथवा अंमलबजावणी अभिकरणास कार्यक्रम अधिकाऱ्याने / सह कार्यक्रम अधिकाऱ्याने निर्देशित केलेल्या व्यक्तींना कामावर सामावून घेणे किंवा काम हाती घेणे किंवा काम चालू करणे शक्य नसेल) तर राज्य शासनावर बेरोजगार भत्ता प्रदान करण्याचे कोणतेही दायीत्व असणार नाही.

**(ख)** एखादा अर्जदार, जो,–

१. त्याला देण्यात आलेला रोजगार स्वीकारणार नाही.

२. कार्यक्रम अधिकाऱ्याने / सह कार्यक्रम अधिकाऱ्याने अथवा अंमलबजावणी अभिकरणाने त्याला कामावर उपस्थित राहण्याबाबत अधिसूचित केल्याच्या ७ दिवसांच्या आत कामावर उपस्थित राहणार नाही.

३. एका आठवड्यापेक्षा अधिक काळ, संबंधित अंमलबजावणी प्राधिकरणाची परवानगी न घेता कामावर सतत गैरहजर राहत असेल किंवा,

४. एका महिन्यात, एकूण एका आठवड्यापेक्षा अधिक काळ गैरहजर राहत असेल तर,

५. या नियमांखालील आवश्यक असलेल्या पात्रता अटींची पूर्तता करत नसेल तर अधिनियमाखाली देय असलेल्या बेरोजगार भत्त्याची मागणी करण्यास पात्र असणार नाही.

(ग) एखाद्या व्यक्तीने, अगोदरच रोजगार मिळालेला असतांना, बेरोजगार भत्त्यासाठी मागणी केली असेल व तो स्वीकारल्याचे आढळून आले तर ती व्यक्ती, ज्या दिवशी तिने बेरोजगार भत्त्यासाठी मागणी केल्याचे व तो स्वीकारल्याचे आढळून आले असेल त्या शेवटच्या दिवसापासून ३ महिन्यांच्या कालावधीसाठी बेरोजगार भत्ता मिळण्यास हक्कदार असणार नाही.

**१०. विवक्षित परिस्थितीत बेरोजगार भत्त्याचे संवितरण न करणे :—**

(१) कार्यक्रम अधिकारी / सह कार्यक्रम अधिकारी, त्यांच्या नियंत्रणात नसलेल्या कोणत्याही कारणामुळे बेरोजगार भत्त्याचे वेळेवर किंवा काहीच वितरण करण्याच्या स्थितीत नसेल तर, तो, जिल्हा कार्यक्रम समन्वयकाला ही बाब कळवील आणि त्याच्या व ग्रामपंचायतीच्या सूचना फलकावर आणि त्याला योग्य वाटेल अशा इतर ठळक जागी लावावयाच्या नोटिशीमध्ये अशी कारणे घोषित करील.

(२) जिल्हा कार्यक्रम समन्वयकाने अशी प्रकरणे राज्य शासनाला कळविली पाहिजेत आणि राज्य शासन शक्य तितक्या लवकर, बेरोजगार भत्ता प्रदान करण्यासाठी सर्व उपाययोजना करील.

**११. वार्षिक अहवाल :—**

राज्य शासनाला, बेरोजगार भत्त्याची एम. आय. एस. व वार्षिक अहवाल विहित करता येईल आणि महाराष्ट्र रोजगार हमी परिषदेच्या वार्षिक अहवालात बेरोजगार भत्त्याचे अहवाल समाविष्ट करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करता येतील.

नमुना क्रमांक १

(नियम ५ पहा)

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ खाली बेरोजगार भत्त्यासाठी करावयाचा अर्ज

(१) नाव ..

(२) पत्ता ..

(३) स्त्री/पुरुष ..

(४) वय ..

(५) जॉब कार्ड क्रमांक ..

(६) नोंदणीचा दिनांक ..

(७) अधिनियमाखालील नमुना क्र.४ मध्ये रोजगारासाठी अर्ज कोणत्या तारखेस व कोणास दिला.

(८) अधिनियमाखालील नमुना क्र. ४ मध्ये कामाच्या मागणीकरिताची प्रत तसेच अधिनियमाखालील नमुना क्र.५ मध्ये पोचपावतीची प्रत.

(९) किती दिवसांसाठी बेरोजगार भत्त्याची मागणी केली आहे.

(१०) बेरोजगार भत्त्याच्या मागणीच्या कालावधीच्या प्रारंभाची तारीख.

मी, ________ राहणार ____________ गांभीर्यपूर्वक असे जाहीर करते/करतो की, मी दि. ______ रोजी अधिनियमांतर्गत नमुना क्र. ४ मध्ये कामासाठी अर्ज केला होता. परंतु मला काम देण्यात आले नाही. या अर्जाद्वारे ज्या कालावधीसाठी मी बेरोजगार भत्त्याची मागणी केली आहे त्या कालावधीत मी कोठेही रोजगारावर नव्हते/नव्हतो आणि याद्वारे अशी हमी देते/देतो की, उपयुक्त कालावधीत किंवा त्यापैकी काही काळात मी रोजगारावर होते/होतो असे सिद्ध झाल्यास त्या कालावधीसाठी मिळालेले बेरोजगार भत्त्याची रक्कम शासनास परत करीन.

अर्जदाराची सही/अंगठ्याची निशाणी.

दिनांक ......................

नमुना क्रमांक २

[नियम ५(घ) पहा]

## महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ खाली बेरोजगार भत्ता मंजुरीचे आदेश

क्रमांक ............

प्रति,

नोंदणी प्राधिकारी,

गाव ...............................

पंचायत समिती .................

.................................................. गावातील रहिवाशी श्री./श्रीमती/कुमारी ..........................................................................

.................................................. (जॉब कार्ड क्रमांक ...............................................................................)

यांस दिनांक ............................................ पासून ..............................................................................

पर्यंतच्या कालावधीकरिता बेरोजगार भत्ता म्हणून ................................................ रुपये

(अक्षरी रुपये ......................................................फक्त) देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांच्या बँक/पोस्ट खात्यात जमा करण्यात यावी.

ठिकाण ................. कार्यक्रम अधिकारी/सह कार्यक्रम अधिकाऱ्याची स्वाक्षरी.

दिनांक ................. तहसील/ पंचायत समिती ...........................

प्रत-

श्री./श्रीमती/कुमारी ............................राहणार ........................................यांस त्यांच्या बेरोजगार भत्त्य विषयीच्या दिनांक .............................. च्या अर्जाच्या संदर्भात अग्रेषित.

नमुना क्र. ३

[नियम ५ (घ) पहा]

## महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ खाली बेरोजगार भत्ता अर्ज ना मंजूर केल्याबाबतची सूचना

प्रति,

श्री./श्रीमती/कुमारी ..........................................................................................

जॉब कार्ड क्रमांक ..........................................................................................

गाव ..........................................................................................

पंचायत समिती ..........................................................................................

**संदर्भ.**– आपला दिनांक .......................................................... चा बेरोजगार भत्त्यासंबंधीचा अर्ज.

खाली नमूद केलेल्या कारणांमुळे दिनांक ..................................पासून ..................................

पर्यंतच्या कालावधीकरिता बेरोजगार भत्त्यासाठी केलेली आपली मागणी नामंजूर करण्यात येत आहे. :

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

कार्यक्रम अधिकारी /सह कार्यक्रम अधिकाऱ्याची स्वाक्षरी,

ठिकाण .. ......................

तहसील/ पंचायत समिती .............................. .

दिनांक ..........................

नमुना क्र. ४

(नियम ६ पहा)

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ खाली बेरोजगार भत्याच्या वाटपाची नोंदवही

| अ.क्र. | रोजगार मागणाऱ्याचे नाव | जॉब कार्ड क्रमांक | बेरोजगार भत्ता मंजूर केलेल्या आदेशाचा क्रमांक व दिनांक | मंजूर केलेल्या बेरोजगार भत्याचा कालावधी | रक्कम | भत्ता दिल्याचा दिनांक | भत्ता घेणाऱ्याची सही | साक्षीदाराचे नाव व सही | अधिकाऱ्याची सही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |

नमुना क्रमांक ५

(नियम ६ पहा)

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ खाली वितरण केलेल्या बेरोजगार भत्याचे मासिक विवरणपत्र ........... महिन्यांसाठी

(१) कार्यक्रम अधिकारी/सह कार्यक्रम अधिकाऱ्याकडून बेरोजगार भत्ता संवितरणासाठी मिळालेल्या रकमेतून या महिन्याच्या सुरुवातीची शिल्लक ........ रु. ...................

(२) या महिन्यात मिळालेली रक्कम ......... रु. ..................

(३) एकूण ......... रु. ..................

(४) या महिन्यात केलेल्या संवितरणाची संख्या ......... रु. ..................

(५) या महिन्यात संवितरण केलेली रक्कम ......... रु. ..................

(६) या महिना अखेरची शिल्लक (३ उणे ५) ......... रु. ..................

ठिकाण ..........................

दिनांक ..........................

नोंदणी प्राधिकाऱ्याची सही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व्ही. गिरीराज,

शासनाचे प्रधान सचिव (रोहयो).